आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३ फेब्रुवारी २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- महाकुंभमेळ्यातल्या चेंगराचेंगरीत अनेक जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेवरुन आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे प्रचंड गदारोळ

- वक्फ सुधारणा विधेयकावर संयुक्त संसदीय समितीचा अहवाल लोकसभेत आज सादर होणार

- दिल्ली विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संध्याकाळी संपणार

- भारतीय - अमेरिकन गायिका चंद्रिका टंडन हिला त्रिवेणी या आल्बम करिता ग्रॅमी पुरस्कार

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांमधे सेनादलं आणि कर्नाटक संघांना प्रत्येकी १७ सुवर्ण पदकांची कमाई तर महाराष्ट्राला १३ सुवर्ण मिळून एकूण ५२ पदकं

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभमेळाव्यात झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेवरुन आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे प्रचंड गदारोळ झाला. महाकुंभ व्यवस्थापनात ढिसाळपणा झाल्याचा आरोप

करत लोकसभेत विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अभिभाषणात या दुर्दैवी घटनेचा उल्लेख केला होता. अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावरच्या चर्चेदरम्यान सदस्यांना आपलं म्हणणं मांडता येईल असं सभापती ओम बिरला यांनी सांगितलं.

त्यानंतर लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावावर चर्चा सुरु झाली आहे.

राज्यसभेत कामकाज सुरु झाल्यावर महाकुंभाच्या मुद्द्यावरुन विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणा द्यायला सुरुवात केली. या आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधकांनी दिलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळले. त्याच्या निषेधात काँग्रेस, समाजवादी पार्टी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि इतर पक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केला.

**<><><><><>**

लोकसभेत आज वक्फ सुधारणा विधेयकावर संयुक्त संसदीय समितीचा अहवाल सादर होणार आहे. जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील या समितीनं पडताळलेल्या पुराव्यांची नोंदही सभागृहासमोर ठेवली जाईल. संयुक्त संसदीय समितीने मसुदा अहवाल आणि सुधारित विधेयक स्वीकारलं असून काही सदस्यांनी असहमतीच्या नोंदी केल्या आहेत.

**<><><><>**

आशियातलं सर्वात मोठं विमानतळ असलेल्या जेवर या नॉयडा इथल्या विमानतळावरून  येत्या एप्रिल महिन्यापासून नियमित हवाई वाहतूक सुरु होईल, असं केंद्रीय मंत्री के राममोहन नायडू यांनी आज राज्यसभेत सांगितलं. आपला देश ही हवाई वाहतूक क्षेत्रातली जगातली सर्वात मोठी बाजारपेठ असल्याचं त्यांनी या संदर्भातल्या एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. उडान विस्तार योजनेअंतर्गत येत्या १० वर्षांमध्ये १०० नवीन विमानतळं देशभरात सुरु होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणूक तसंच उत्तर प्रदेश आणि तमिळनाडूतल्या पोटनिवडणुकीसाठी एक्झिट पोल म्हणजे मतदानोत्तर चाचणीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने बंदी घातली आहे. येत्या बुधवारी म्हणजेच मतदानाच्या दिवशी  सकाळी ७ पासून संध्याकाळी साडेसहापर्यंत हे बंदी आदेश लागू राहतील. त्याचप्रमाणे मतदानापूर्वी ४८ तास प्रसारमाध्यमांना कोणत्याही प्रकारचे ओपिनियन पोल प्रसिद्ध करता येणार नाहीत.

या निवडणुकांसाठी प्रचाराची मुदत आज संध्याकाळी संपत आहे. दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी तसंच तमिळनाडू आणि उत्तरप्रदेशातल्या

प्रत्येकी एका पोटनिवडणुकीसाठी ५ फेब्रुवारीला मतदान होईल. मतमोजणी ८ फेब्रुवारीला होणार आहे.

<><><><><>

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या एन व्ही एस - झीरो टू या उपग्रहाला नियोजित कक्षेत जाण्यात अपयश आलं आहे. उपग्रहाला नियोजित कक्षेत स्थापित करणाऱ्या थ्रस्टरच्या झडपा वेळेवर उघडल्या नाहीत, असं इसरोतर्फे सांगण्यात आलं. संबंधित तांत्रिक अडथळा दूर करण्याच्या दृष्टीनं पर्यायी व्यवस्थेचा वापर केला जात आहे, असंही इसरोनं म्हटलं आहे. हसन इथली मुख्य नियंत्रण यंत्रणा परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे, उपग्रहाच्या इतर सर्व यंत्रणा तंदुरुस्त आहेत, सध्या उपग्रह लंबगोल कक्षेत असून त्यावरची सौर पॅनेल्स कार्यान्वित झाली आहेत, इत्यादी माहिती यात नमूद केली आहे.

<><><><><>

भारतीय - अमेरिकन गायिका चंद्रिका टंडन हिनं आपल्या त्रिवेणी आल्बम करिता ग्रॅमी पुरस्कार पटकावला आहे. लॉस अँजेलिस मध्ये आज झालेल्या ६७ व्या वार्षिक पुरस्कार वितरण सोहळ्यात अकरा नामांकनं मिळवणारी बियॉन्स हिचा काउ बॉय कार्टर हा आल्बम सर्वोत्कृष्ट ठरला. ग्रॅमी मध्ये सर्वात जास्त नामांकनं मिळवणारी कलाकार असा इतिहासही तिनं यासोबत

रचला. सबरीना कार्पेन्टर हिनं आपल्या कारकिर्दीतला पहिला ग्रॅमी पुरस्कार जिंकला. केन्ड्रिक लॅमर , बीटल्स, डोएची या कलाकारांनीही पुरस्कारावर आपली नावं कोरली.

<><><><><>

अमेरिकेमधून येणाऱ्या मालावर शुल्क आकारण्याचा निर्णय कॅनडा आणि मेक्सिको यांनी घेतला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडा , मेक्सिको आणि चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे , त्याला प्रत्युत्तर म्हणून या दोन देशांनी हा निर्णय जाहीर केला आहे. अमेरिकेमधून आयात केल्या जाणाऱ्या ३० अब्ज डॉलर किमतीच्या मालावर २५ टक्के शुल्क आकारलं जाईल, असं कॅनडानं घोषित केलं आहे, मात्र मेक्सिकोनं अद्याप तपशील जाहीर केलेला नाहीत. अमेरिकी मालावर प्रत्युत्तरादाखल शुल्क आकारणी केली तर अमेरिकाही शुल्कदरात वाढ करेल, असा इशारा ट्रम्प यांनी दिल्यावरही या दोन देशांनी हा निर्णय जाहीर केला आहे.

कॅनडा ही अमेरिकेसाठी सर्वात मोठी निर्यात बाजारपेठ असून मेक्सिको हा अमेरिकेचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे.

<><><><><>

इंग्लंडचे राजे चार्ल्स यांचे धाकटे बंधू प्रिन्स एडवर्ड हे सध्या मुंबई भेटीवर असून त्यांनी काल राजभवनात महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत त्यांनी भारत आणि ब्रिटनमधले संबंध मजबूत होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं तसंच दोन्ही देशांमधे सहकार्याची भावना वाढीला लागावी, अशी इच्छाही व्यक्त केली. भारतात क्रिकेट या खेळाची लोकप्रियता नमूद करून बॅडमिंटनमधे भारताच्या प्रगतीचंही त्यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत  काल सहाव्या दिवशी विविध संघांनी आपल्या खेळाचं शानदार प्रदर्शन केलं. सेना दल संघ आणि कर्नाटकला प्रत्येकी १७ सुवर्ण मिळाले आहेत. मात्र सेना दल संघाला १० रौप्य आणि ८ कांस्य तर कर्नाटकला ९ रौप्य आणि ९ कांस्य पदकं असल्याने सेना दल संघ पदकतालिकेत पहिल्या स्थानावर आहे, तर कर्नाटक दुसऱ्या स्थानावर आहे. तर महाराष्ट्र १३ सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. मात्र २३ रौप्य आणि १६ कांस्य पदकं जिंकून महाराष्ट्राने सर्वाधिक ५२ पदकं जिंकली आहेत.

मणिपूर ११ सुवर्ण पदकांसह चौथ्या तर मध्यप्रदेश ९ सुवर्ण पदकांसह पाचव्या स्थानावर आहे.

तामिळनाडू  आणि हरियाणानेही स्पर्धेत चांगल्या खेळाचं प्रदर्शन केलं आहे. तामिळनाडूने ८ तर हरियाणाने ६ सुवर्ण पदकं जिंकली आहेत. याशियाव केरळ, दिल्ली आणि उत्तर प्रदेशाचे संघ देखाली पदकतालिकेत पहिल्या दहा संघामधे आहेत. यजमान उत्तराखंडच्या खात्यात आतापर्यंत केवळ एक सुवर्ण पदक पडलं आहे.

**<><><><><>**

व्हॉलीबॉलमधे पुरुष संघांच्या काल झालेल्या अंतिम सामन्यात सेना दल संघाने केरळचा  ३-१ असा पराभव करून सुवर्ण पदकावर आपलं नाव कोरलं. सेना दल संघाने पहिले दोन सेट २५-२० आणि २५-२२ असे जिंकले. तिसऱ्या सेटमधे केरळने जोरदार टक्कर देत सेना दल संघाला २५-१९ असं नमवलं. मात्र चौथ्या सेटमध्ये सेना दल संघाने केरळला २५-१९ च्या फरकाने हरवून सुवर्ण मिळवलं.

कांस्य पदकाच्या सामन्यासाठी तामिळनाडूने उत्तराखंडला ३-० असं हरवलं.

महिलांच्या हॉलीबॉल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात केरळने तामिळनाडूचा ३-२ असा पराभव केला. पहिला सेट केरळने २५-१९ असा जिंकला. मात्र पुढच्या दोन सेटमधे तामिळनाडूने २५-२२, २५-२२ ने केरळला नमवलं.

शेवटच्या सेटमध्ये १५-७ असा विजय मिळवत केरळने सुवर्ण आपल्या खात्यावर नोंदवलं.

कांस्य पदकाच्या सामन्यात राजस्थानने चंदीगडला ३-० नं हरवलं.

**<><><><><>**

फूटबॉलमधे हरियाणा, ओदिशा, पश्चिम बंगाल आणि दिल्लीने आपापल्या गटात  विजयी सलामी दिली आहे. गट अ मधे हरियाणाने  तामिळनाडूला ७-० अशा मोठ्या फरकाने हरवलं. तर ओदिशाने सिक्कीमवर ५-१ अशी मात केली. गट ब मधे पश्चिम बंगालने यजमना उत्तराखंडला २-० नं  हरवत स्पर्धेत आगेकूच केली आहे. या सामन्यात पश्चिम बंगालने सुरुवातीपासूनच उत्तराखंडवर वर्चस्व राखलं. गट ब मधल्या दुसऱ्या सामन्यात दिल्लीच्या संघाने मणिपूरला २-१ ने नमवत स्पर्धेत शानदार सुरुवात केली आहे.

**<><><><><>**

टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेचं विजेतेपद आर. प्रज्ञानंद यानं पटकावलं आहे. काल झालेल्या सामन्यात त्याने सध्याचा विश्वविजेता डी. गुकेशवर विजय मिळवला. प्रज्ञानंद आणि गुकेश दोघेही १३ फेऱ्यानंतर साडे आठ गुणांसह बरोबरीत होते.

**//<><><><><>//**